# आरोग्य-स्वराज्य

डॉ. अभय बंग

राजहंस प्रकाशन

निरोगी जीवनशैली व स्वराज्य
यांची मांडणी करणारे द्रष्टे
**महात्मा गांधी,**
'स्वस्थ' शब्दाचा अर्थ मला उलगडून सांगणारे त्यांचे नातू
**प्रो. रामचंद्र गांधी**
व
आरोग्य-स्वराज्याचे प्रयोग ज्यांच्या सोबत केले, ते
**गडचिरोलीचे लोक**
यांना

# प्रस्तावना

आरोग्य हा अक्षरश: जगण्या-मरण्याचा विषय आहे. पण बहुतेकदा त्याविषयी गांभीर्याने विचार मरणाच्या दारात पोहोचल्यावरच होतो. निरोगी कसे जगावे, याऐवजी मरण कसे टाळावे, या अंगानेच त्याकडे पाहिले जाते. त्यामुळे डॉक्टर, रुग्णालये, औषधे, वैद्यकीय विमा यांचे महत्त्व वाढते. सर्व प्रयत्न व पैसा त्यासाठीच खर्च होतो. त्याऐवजी काय व्हायला हवे? एका शब्दात त्याचे उत्तर आहे, आरोग्य-स्वराज्य!

'आरोग्य-स्वराज्य' हा नवा शब्द आहे. त्याद्वारे आरोग्य या विषयाला स्वराज्य विचार लागू करण्याचा माझा प्रयत्न आहे. 'आरोग्य-स्वराज्य' हा शब्द नवा असला, तरी त्याचा आधारभूत स्वराज्य विचार हा महात्मा गांधींच्या 'हिंद-स्वराज्य' व विनोबांच्या 'ग्राम-स्वराज्य'मध्ये प्रकट झालेला आहे. 'स्वस्थ' म्हणजे जो 'स्व मधे स्थित आहे' असा (आत्मनिर्भर, स्वतंत्र), तसेच स्वराज्य म्हणजे स्वत:चे राज्य नव्हे, तर स्वत:वर राज्य (आत्म-संयम, स्व-नियंत्रण). हे दोन शब्दार्थ आरोग्य-स्वराज्याचा अर्थ उलगडण्याची गुरूकिल्ली आहेत. रोगांपासून मुक्त जगण्याचे स्वातंत्र्य हवे असेल, तर स्वस्थ व स्वराज्य हे दोन्ही आवश्यक आहेत.

गेली चाळीस-पंचेचाळीस वर्षे मी, राणी व माझे सहकारी या दिशेने विचार, प्रयोग व प्रयत्न करत आलो आहोत. 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' ह्या पुस्तकातून, तसेच 'सेवाग्राम ते शोधग्राम' ह्या लेखातून ह्या शोधयात्रेची व्यक्तिगत कहाणी मी पूर्वी सांगितली आहे. ती मराठी वाचकांनी गोड मानून घेतली आहे. या शोधाची वैज्ञानिक बाजू इंग्रजीत प्रकाशित वैज्ञानिक निबंध व अहवालांद्वारे आम्ही मांडली. सुदैवाने त्यांना जागतिक मान्यता मिळाली. काही राष्ट्रीय व जागतिक आरोग्य-धोरणांना आकार देण्यात त्यांचा हातभार लागला. त्यासोबतच या शोधाची वैचारिक व सामाजिक बाजू मी मराठीत वेळोवेळी लेख, भाषणे व अभ्यासांच्या रूपात मांडली आहे. विविध असले, तरी त्यांमध्ये एक सामान्य धागा आहे. तो 'आरोग्य-स्वराज्य' पुस्तकाच्या रूपात संकलित केला आहे.

पुस्तकाच्या पहिल्या विभागात आरोग्य-स्वराज्य विचार विविध अंगांनी मांडला आहे. दुसऱ्या विभागात आरोग्य व समाज परिवर्तनासाठी विज्ञान व संशोधन या पद्धतीची शक्ती, प्रत्यक्ष अभ्यासाची दोन उदाहरणे व त्याबाबत काही विचार आहेत. ('सेवाग्राम ते शोधग्राम' या लेखामध्ये अजून उदाहरणे आढळतील.) 'समाज व परिवर्तन' या तिसऱ्या विभागात परिवर्तनासाठी अजून वेगळी दृष्टी आढळेल. चौथा विभाग हा आरोग्यासाठी जागतिक धोका बनलेला विषय - व्यसन आणि त्यावर आरोग्य-स्वराज्य पद्धतीने परिवर्तन आणण्याचे प्रयोग व पद्धती यांचा आहे.

हे लेख चाळीस वर्षांच्या कालखंडातले असल्यामुळे तसेच ते सलग लिहिलेले नसल्यामुळे काही जागी वाचकांना काळ व परिस्थिती यासोबत थोडे जुळवून घ्यावे लागेल. चाळीस व वीस वर्षांपूर्वीचे दोन अभ्यास-निबंध ('ग्रामीण मजुरीचा दर काय असावा?' आणि 'कोवळी पानगळ') यांचा अंतर्भाव यांत केला आहे. या दोन्ही निबंधांनी त्या काळी महाराष्ट्राला धक्के दिलेत व महत्त्वाचे धोरण परिवर्तन घडवून आणण्यासाठी वैज्ञानिक आधार दिला.

समाजसेवा व समाज-परिवर्तन हे निव्वळ भावनेवर आधारित कार्य न राहता त्यांना विचार व विज्ञान यांचे भक्कम अधिष्ठान मिळावे, हा माझा प्रयत्न आहे. त्यामुळे अभ्यास, संशोधन, वैज्ञानिक पुरावा या समाज परिवर्तनाच्या महत्त्वाच्या पद्धती ठरतात. ती दृष्टी यांत आढळेल. ती समाजात स्वीकृत व्हावी, दृढ व्हावी; अशी आकांक्षा आहे, म्हणूनच पुन्हा पुन्हा सांगायची. वाचकांना काही जागी पुनरावृत्तीदेखील सहन करावी लागेल. ती वगळल्यास विषयाच्या मांडणीचा प्रवाह खंडित होईल, असे वाटल्याने काही पुनरावृत्ती राहू दिली आहे.

याच दृष्टीने 'या जीवनाचे काय करू?' या माझ्या पूर्वीच्या पुस्तकात प्रकाशित केलेला एक लेख 'सेवाग्राम ते शोधग्राम' याचा पुन्हा 'आरोग्य-स्वराज्य' पुस्तकात अंतर्भाव केला आहे. आरोग्य-स्वराज्याच्या दिशेने केलेल्या प्रयत्नांची व प्रवासाची कहाणी त्यात आहे. या पुस्तकातील

मुख्य विषयाच्या पूर्णतेसाठी ही पुनरावृत्ती लेखक, संपादक व प्रकाशकांनी जाणीवपूर्वक केली आहे.

'राजहंस प्रकाशन', विशेषत: श्री. दिलीप माजगावकर यांचा पुढाकार व श्रीमती करुणा गोखले यांच्या प्रयत्नांमुळेच हे विचार पुस्तकरूपात पुन्हा वाचकांच्या भेटीला सादर होऊ शकत आहेत. मी त्यांचा मनापासून ऋणी आहे.

वाचकांनी हे पुस्तक वाचल्यास मी त्यांचा ऋणी राहीन. पण त्याहून अधिक ऋणी ते मला करू शकतात, यातील विचार व कल्पनांना प्रत्यक्ष आचरणात आणून.

याजसाठी होता अट्टाहास.

**डॉ. अभय बंग**
शोधग्राम, २५ सप्टेंबर २०२३.

## पूर्व-प्रकाशन : साभार

| विभाग | मूळ प्रकार | पूर्व प्रकाशन | वर्ष |
|---|---|---|---|
| **आरोग्य - स्वराज्य** | | | |
| १. आरोग्य-स्वराज्य | भाषण | पुणे पोस्ट | २०१४ |
| २. आरोग्याचे तीन महाप्रश्न व मुक्तीचे मार्ग | भाषण | साप्ताहिक सकाळ | २००१ |
| ३. रोगी कोण? उपाय काय? | लेख | अप्रकाशित | |
| ४. महात्मा गांधींचा आरोग्य-विचार | भाषण | अप्रकाशित | |
| ५. उद्याच्या महाराष्ट्रासाठी नवे स्वप्न : सर्वांसाठी आरोग्य | भाषण | वनराई विशेषांक | २०१२ |
| **समाज-परिवर्तनासाठी विज्ञान** | | | |
| १. ग्रामीण मजुरीचा दर काय असावा? | लेख | साप्ताहिक साम्ययोग | १९८० |
| २. कोवळी पानगळ | लेख | 'सर्च' | २००१ |
| ३. विज्ञानाने मला काय दिले? | लेख | साधना | २०२० |
| ४. संशोधन कुणासाठी? कसे? - चार पायऱ्या | लेख | अप्रकाशित | |
| **समाज व परिवर्तन** | | | |
| १. एका माणसाने राजकीय परिवर्तन करण्याचा मार्ग | लेख | लोकमत दिवाळी अंक | २०१२ |
| २. थेंबातला समुद्र, कणातली पृथ्वी | लेख | लोकमत दीपोत्सव | २०११ |
| **व्यसन व दारुमुक्ती** | | | |
| १. मोहफुलाच्या जंगलातले दारूविरुद्ध आंदोलन | लेख | सुजन दिवाळी/ लोकमत | १९९२ |
| २. महाराष्ट्र की मद्यराष्ट्र? | लेख | साधना | २०१५ |
| ३. धान्यापासून दारू : शेतकऱ्यांच्या फायद्याचा भ्रम व भ्रमनिरास | लेख | दैनिक लोकसत्ता | २०१० |
| ४. तंबाखू व दारूपासून मुक्ती शक्य आहे का? शास्त्र आणि शस्त्र | मुलाखत | वनराई विशेषांक | २०२० |
| ५. दारू व तंबाखू : बंदीकडून मुक्तीकडे, लोकांच्या शक्तीकडे | भाषण | साधना | २०१९ |

# अनुक्रम

**विभाग १ : आरोग्य-स्वराज्य**
१. आरोग्य-स्वराज्य / १५
२. आरोग्याचे तीन महाप्रश्न व मुक्तीचे मार्ग / ३४
३. सेवाग्राम ते शोधग्राम / ५८
४. रोगी कोण? उपाय काय? / ९८
५. महात्मा गांधींचा आरोग्य-विचार / १०२
६. उद्याच्या महाराष्ट्रासाठी नवे स्वप्न : सर्वांसाठी आरोग्य / ११८

**विभाग २ : समाज परिवर्तनासाठी विज्ञान**
१. ग्रामीण मजुरीचा दर काय असावा? / १२७
२. कोवळी पानगळ / १३५
३. विज्ञानाने मला काय दिले? / १६४
४. संशोधन कुणासाठी? कसे? - चार पायऱ्या / १७१

**विभाग ३ : समाज व परिवर्तन**
१. एका माणसाने राजकीय परिवर्तन करण्याचा मार्ग / १८१
२. थेंबातला समुद्र, कणातली पृथ्वी / १८७

**विभाग ४ : व्यसन व दारूमुक्ती**
१. मोहफुलाच्या जंगलातले दारूविरुद्ध आंदोलन / २०३
२. महाराष्ट्र की मद्यराष्ट्र? / २१४
३. धान्यापासून दारू : शेतकऱ्याच्या फायद्याचा भ्रम व भ्रमनिरास / २३०
४. तंबाखू व दारूमुक्ती शक्य आहे का? शास्त्र आणि शस्त्र / २४०
५. दारू व तंबाखू : बंदीकडून मुक्तीकडे : लोकांच्या शक्तीकडे / २५६

# १. आरोग्य-स्वराज्य

## आपली आरोग्य अवस्था

'झेन' पंथात एक कथा आहे.

एक साधू हिमालयात तपस्या करत होता. एका खोल दरीच्या तोंडावर झुकलेल्या झाडाच्या पारंबीला लोंबकळून त्याची कठीण तपस्या सुरू होती. पारंबी त्यानं केवळ दातांनी धरली होती व देह दरीत लोंबकळत होता. दरीच्या तोंडावरून कुणी जिज्ञासू चालला होता. त्यानं थांबून साधूला प्रश्न विचारला, ''मुक्तीचा मार्ग कोणता?'' साधूला मोठा प्रश्न पडला. उत्तर देण्यासाठी तोंड उघडलं, तर पारंबी सुटून खाली खोल दरीत कोसळणार. उत्तर दिलं नाही, तर अज्ञानींना मार्ग सांगण्याच्या आपल्या कर्तव्यापासून च्युत होणार.

साधूसमोर जीवन-मरणाचा प्रश्न उभा झाला. बोलला तर मृत्यू, नाही बोलला, तर कर्तव्य-मृत्यू! काय करावं?

आरोग्याच्या बाबतीत आज असंच द्वंद्व सामान्य माणसासमोर उभं आहे. कोविडपासून कॅन्सरपर्यंत जीवघेणे रोग वाढले आहेत. पण विज्ञानाच्या चमत्कारामुळे आता वैद्यकशास्त्राकडे अत्यंत प्रभावी उपचार उपलब्ध आहेत. लसी व जंतुमारक अँटिबायोटिक्स औषधांपासून सुरुवात होऊन आता बायपास सर्जरी, किडनी प्रत्यारोपण, कॅन्सरसाठी किमोथेरपी, टेस्टट्युब बेबी जे मागाल, ते उपलब्ध आहे. अडचण एकच - या सर्वांवर अत्यंत महाग किमतीची लेबलं आहेत.

बाजारातील शोरूममधील आकर्षक वस्तूंसारखे हे उपचार खुणावतात, आशा दाखवतात. पण त्याच वेळेस त्या उपचारांचा खर्च सामान्य माणसाला आयुष्यभरासाठी कर्जबाजारी करू शकतो. उपचारांवर लाखो रुपये खर्च करून

आयुष्याची काही वर्षं मिळवा व ती कर्ज फेडण्यासाठी खर्च करा. रोगी माणसानं काय करावं? वैद्यकीय उपचार विलक्षण प्रभावी आहेत. ते नाकारले, तर मृत्यू; स्वीकारले, तर आर्थिक मृत्यू.

त्या झेन साधूसारखाच कूटप्रश्न आपल्यासमोर आज उभा आहे. काय करावं?

अजून एक प्रश्न आहे. महाभारतात सरोवरातील पाणी पिण्यापूर्वी अट म्हणून यक्ष एक प्रश्न युधिष्ठिराला विचारतो. ''जगातील सर्वांत मोठं आश्चर्य कोणतं?'' ते आश्चर्य आहे - आपल्या सर्वांसमोर स्वत:च्या मृत्यूचं अटळ वास्तव उभं आहे; कोणीच त्यापासून सुटलेला नाही; पण तरी आपण मृत्यूच्या वास्तवाकडे पूर्ण दुर्लक्ष करतो. 'मी अमर आहे. रोग व मृत्यू हे दुसऱ्याला येणार आहेत. मी मात्र सदैव रोगमुक्त, अमर राहणार.' या भ्रमात आपण बेफिकीर, निष्काळजी जगतो.

विन्स्टन चर्चिल जेव्हा पंचाऐंशी वर्षांचे झाले, तेव्हा त्यांची मुलाखत घ्यायला एक तरुण पत्रकार गेला. मुलाखत पूर्ण झाल्यावर वृद्ध चर्चिलना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत तो म्हणाला, ''तुम्हाला शंभर वर्षं आयुष्य लाभो व तुमच्या शंभराव्या वाढदिवशी मी पुन्हा तुमची मुलाखत घेऊ शकावं, अशी माझी इच्छा आहे.''

त्या तरुणाकडे निरखून बघत पंचाऐंशी वर्षांचे चर्चिल म्हणाले, ''तुझी तब्येत तर धडधाकट दिसते. त्यामुळे तोपर्यंत तू जिवंत राहण्याला काही अडचण दिसत नाही!''

अडचण त्याला नाही, तुम्हाला आहे मिस्टर चर्चिल!

पण, आपण सर्व चर्चिल आहोत. मृत्यू आपल्याकडे येतो आहे, या वास्तवाकडे आपण डोळेझाक करतो.

भारतीय परंपरेत, शंभर वर्षं सक्रियपणे जगण्याचा आदर्श आहे. आपल्या सगळ्यांना तशी अनिवार इच्छा आहे. वेडी आशा आहे. पण हे शक्य होईल का? कसं शक्य होईल?

मित्रांनो, प्रश्न अतिशय जिव्हाळ्याचा आहे. जीवन-मरणाचा आहे, आपल्याच जीवन-मरणाचा आहे. उत्तर शोधण्यासाठी आपण दोन प्रश्न स्वत:ला विचारू. अत्यंत गंभीरपणे विचारू व प्रामाणिकपणे उत्तर मिळावं, म्हणून काही क्षण आपले डोळे बंद करू. कोणी बघत नाही. स्वत:लाच उत्तर द्यायचं आहे. तत्काळ, उत्स्फूर्त काय उत्तर आतून उमटतं, ते बघा.

पहिला प्रश्न - मी शंभर वर्षं जगेन का?

# २. आरोग्याचे तीन महाप्रश्न व मुक्तीचे मार्ग

*'साप्ताहिक सकाळ'च्या वर्धापनदिनाला वर्ष २००० साली डॉ. अभय बंग प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. या समारंभात झालेले त्यांचे भाषण इतके प्रत्ययकारी होते, की ऐकणाऱ्यांसाठी तो एक अविस्मरणीय अनुभव ठरला. त्याला भरभरून प्रतिसाद मिळाला. अनेकांच्या थेट हृदयाला भिडलेलं हे भाषण जसंच्या तसं इथे देत आहोत. ज्यांना ते ऐकता आलं नाही, त्यांना मुळापासून त्याचा आस्वाद घेता येईल, ज्यांनी ऐकलं आहे; त्यांना पुन:प्रत्ययाचा आनंद मिळेल आणि भाषण संग्रही ठेवता येईल. व्यक्ती आणि समाजाच्या आरोग्याचे महाप्रश्न आणि त्याच्या उत्तराच्या दिशा दाखविणारं हे चिंतन.*

*- संपादक, 'साप्ताहिक सकाळ'.*

मित्रांनो, 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' या लेखाच्या आणि पुस्तकाच्यामार्फत जी संवादाची प्रक्रिया आपल्या सर्वांसोबत सुरू झालेली आहे, आजच्या व्याख्यानाच्या निमित्तानं तीच पुढे चालवण्याचा माझा विचार आहे. पूर्वीची प्रक्रिया ही बरीच अनुभवांवर आधारित होती. गेल्या एक-दीड वर्षांत त्या अनुभवांच्या पलीकडे अजून जे काही नवे विचार मला खुणावत आहेत किंवा अस्वस्थ करताहेत, त्यांचीदेखील चर्चा करण्याची संधी मी या व्याख्यानाच्या निमित्तानं घेणार आहे.

## आजच्या युगातले प्रमुख रोग

आरोग्याचे आपले मुख्य प्रश्न कोणते? जागतिक आरोग्य संघटना, वर्ल्ड बँक आणि हार्वर्ड विद्यापीठ या तिघांनी मिळून काही वर्षांपूर्वी ज्याला

# ३. सेवाग्राम ते शोधग्राम

(अभय बंग यांचं बालपण गेलं, महात्मा गांधीचं अनेक वर्षं वास्तव्य असलेल्या सेवाग्राम आश्रमात. बंग अत्युच्च सन्मानानं डॉक्टर झाले. अमेरिकेतील जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठात दोघांनी - राणी व अभय बंग यांनी सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षण घेतलं. भारतात परतून त्यांनी रस्ता धरला गडचिरोलीचा. महाराष्ट्रातील सर्वांत दुर्गम, मागास व आदिवासी जिल्ह्याचा. तिथे त्यांनी केलेल्या कामाचं जागतिक पातळीवर अनेकदा कौतुक झालं, आणि त्यापेक्षाही सामान्य लोकांच्या जीवनात मोलाचा फरक पडला! हे काम त्यांनी का स्वीकारलं, कसं निभावलं, कोणत्या प्रेरणा त्यांना पुढे नेत राहिल्या? या सगळ्या प्रवासाची कथा त्यांनी सांगितली. निमित्त होतं, २००१ साली कॅनडात कॅलगरी इथं भरलेलं बृह्नमहाराष्ट्र अधिवेशन.

त्यांच्या या भाषणाचा वृत्तांत कथन करताना अमेरिकेतील डॉ. प्रकाश लोथे यांनी लिहिलं, की 'भाषणाच्या शेवटी बाराशे श्रोत्यांनी भरलेल्या सभागृहात कंठ दाटून न आलेला, डोळ्यांच्या कडा ओल्या न झालेला एकही श्रोता नव्हता. अधिवेशनात संयोजकांनी दुसरं काहीही न ठेवता फक्त बंग यांचं भाषण ठेवलं असतं, तरी हे अधिवेशन अद्वितीय ठरलं असतं, यात शंका नाही. भाषण संपल्यावर सतत पंधरा मिनिटं लोकांनी बंग यांना 'स्टॅंडिंग ओव्हेशन' दिलं.')

- संपादक, साप्ताहिक सकाळ (२००२)

– ते भाषण, परिवर्धित रूपात.

# ४. रोगी कोण? उपाय काय?

स्वर्गीय दादा धर्माधिकारींना एकदा एका दवाखान्याच्या उद्‌घाटनासाठी बोलवले होते. भाषण करताना दादा म्हणाले, ''तुमचं रुग्णालय ओस पडो, अशी मी शुभेच्छा देतो.'' समाजाला दवाखाने व रुग्णालयांची कमीत कमी आवश्यकता पडावी, ही निरोगी समाजाची खूण असायला हवी. तरीही प्रत्येक जण आजारी पडतो, कधी कधी गंभीर आजारी पडतो. म्हणून रुग्णालय ही समाजाची आवश्यकता बनते. पण रुग्णालये अमर्याद नकोत, मर्यादित हवीत. आजच्या समाजातील भरभराटीला आलेला वैद्यकीय व्यवसाय व शहरांमध्ये जागोजागी उघडलेल्या छोट्या-मोठ्या रुग्णालयांची गर्दी हे समाजाच्या आरोग्याचे चिन्ह नाही. रोगी समाजाचे चिन्ह आहे.

शिवाय रुग्णालये स्वत:च आजारी आहेत. महात्मा गांधींचे 'हिंदस्वराज्य' किंवा इव्हान इलीचचे 'मेडिकल नेमेसिस' या पुस्तकात आम्हा डॉक्टरांवर व रुग्णालयांवर कडाडून टीका आहे. 'सत्यमेव जयते'सारख्या कार्यक्रमातून जेव्हा वैद्यकीय व्यवसायावर दोषारोपण होतात, तेव्हा त्या विरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन निषेध मोर्चा काढत असला, तरी लोकांची सहानुभूती डॉक्टरांना नसते; उलट रुग्णांच्या नाराज नातेवाइकांनी रुग्णालयांवर हल्ला करण्याच्या घटना वारंवार घडताहेत. या सर्वांद्वारे समाज आम्हाला इशारा देतो आहे. डॉक्टर, तुम्ही स्वत:च आजारी आहात.

## आमचे काय चुकते आहे?

भांडवलशाही समाजात रुग्णसेवा हा प्रथम खाजगी वैद्यकीय 'व्यवसाय' झाला, मग खुलेआम धंदा झाला. या धंद्याला ध्येय आहे नफा. त्यामुळे अमाप

महाग झालेली रुग्णसेवा ही केवळ भारताची नव्हे, तर जगभराची समस्या बनली आहे. अमेरिकेत आरोग्यसेवांचा प्रतिमाणसी वार्षिक खर्च दहा हजार डॉलर म्हणजे आठ लाख रुपये आहे. लोकांच्या आयुष्यभराच्या बचतीचा मोठा भाग मृत्यूपूर्वीच्या दहा-पंधरा दिवसांत रुग्णालये हिरावून नेतात. अमेरिकेच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा सतरा टक्के रुग्णसेवेवर खर्च होतो आहे. संपन्न अमेरिकादेखील या ओझ्याखाली कण्हते आहे.

भारतात तर याहून वाईट अवस्था आहे. सर्व प्रकारच्या (शासकीय, खाजगी) आरोग्यसेवांचा एकूण वार्षिक खर्च प्रतिव्यक्ती ५७ डॉलर म्हणजे साडेचार हजार रुपये असलेल्या या देशात निम्म्याहून जास्त रुग्ण खाजगी वैद्यकसेवा घेण्यासाठी बाध्य आहेत. त्या सेवा मुख्यत: शहरातच आहेत. निरुपायाने खिशातून पैसा खर्च करून रुग्णांना रुग्णसेवा विकत घ्यावी लागते. रुग्णालये व औषधांच्या खाजगी खर्चामुळे दरवर्षी पाच कोटी लोक दारिद्र्य रेषेखाली ढकलले जातात. भारतातील दारिद्र्य निर्मितीचे हे नंबर दोनचे कारण आहे, असे वर्ल्ड बँक म्हणते. आणि तरीही या देशात दरवर्षी दहा लक्ष बालमृत्यू होतात. जगात सर्वाधिक गरज ज्यांना, त्यांना उपचार मिळत नाही; हे ढळढळीत वास्तव आहे. पैसा नाही तर उपचार नाही, हा या धंदेवाईक व्यवस्थेचा कायदा आहे.

या प्रश्नावर विचार करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने स्थापलेल्या ‘ग्लोबल कमिशन ऑन मायक्रोइकॉनॉमिक्स अँड हेल्थ’चा अहवाल असो; की भारतात सर्वांना आरोग्यसेवेच्या उपलब्धीसाठी पंतप्रधानांनी स्थापलेल्या उच्चस्तरीय तज्ज्ञ गटाने (ज्याचा मीही एक सदस्य होतो) २०११मध्ये दिलेला ‘Universal Health Coverage’ (सर्वांसाठी आरोग्यसेवा) हा अहवाल असो, सर्वत्र स्पष्ट शिफारस आहे, की आरोग्यसेवा केवळ खाजगी धंदा म्हणून चालविणे सर्वांसाठी अहितकारक आहे. रोग होऊ नयेत, यात या खाजगी वैद्यक व्यवस्थेला रस नसतो. ती रोगांकडे व रुग्णांकडे धंद्याची संधी म्हणून लोभी नजरेने बघते. उपचार पैशाशी जोडलेला असल्याने आजारी झाल्यास गरिबांना उपचार मिळत नाही; व जे विकत घेऊन मिळवतात, त्यांना ती अमाप महाग मिळते, बऱ्याचदा तर विनाकारण दिली जाते. *खाजगी नफ्यासाठी चालवलेली वैद्यकीय सेवा व्यवस्था मानवीय न्यायाच्या दृष्टीने व अर्थशास्त्रीय दृष्टीने अयोग्य ठरते, असा जागतिक व राष्ट्रीय तज्ज्ञांचा निष्कर्ष आहे.*

पण खाजगीकरणाऐवजी आरोग्यसेवेचे सरकारीकरण झाले, तरीदेखील

# ६. उद्याच्या महाराष्ट्रासाठी नवे स्वप्न : सर्वांसाठी आरोग्य

*(महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त महाराष्ट्राच्या विधिमंडळाने ४ व ५ मे २०१२ला आयोजित 'महाराष्ट्र : काल, आज आणि उद्या' या परिसंवादात महाराष्ट्राच्या आरोग्यासाठी भविष्याचा कार्यक्रम मांडणारे भाषण.)*

'गन्स, जर्म्स अँड स्टील' या जगप्रसिद्ध पुस्तकाचा लेखक जॅरेड डायमंड म्हणतो, की राष्ट्रांचा इतिहास त्यांची शस्त्रक्षमता, आरोग्य व उत्पादक तंत्रज्ञान यांनी घडतो. शस्त्रक्षमता व उत्पादक तंत्रज्ञान यांचे महत्त्व समजण्यासारखं आहे. पण आरोग्यदेखील राष्ट्रांचा इतिहास ठरविते? खरंच आरोग्य इतकं महत्त्वाचं आहे का?

दुसऱ्या महायुद्धात जगात शस्त्रांनी जेवढी माणसं मेली, त्याहून अधिक माणसं १९५७मध्ये इन्फ्लुएंझाच्या साथीत मेली. हिरोशिमा-नागासकीच्या दोन अणुबाँबनी जपानमध्ये ५५००० माणसं मेली, पण महाराष्ट्रात आज दरवर्षी जवळपास ८० हजार बालमृत्यू होतात. महाराष्ट्राच्या दीड कोटी मुलांपैकी ३५ टक्के, म्हणजे ५० लक्ष मुले कुपोषित आहेत. ती उद्याची खुरटी, रोगी जनता होईल. यांतून महाराष्ट्राचा उद्या ठरणार आहे. वास्तव असे आहे, की एकविसाव्या शतकातील संभाव्य महाशक्ती होण्याचा भारताचा मनोरथ रोगिष्ट लोकसंख्येच्या भुसभुशीत वाळूवर उभा आहे. आर्थिक विकासासाठी भारताची प्रमुख शक्ती आहे माणसं. लोकसंख्येचा फायदा मिळवायचा असल्यास ती माणसं निरोगी व बळकट हवीत. म्हणून अमर्त्य सेन म्हणतात, 'आरोग्याशिवाय आर्थिक समृद्धी शक्य नाही.' वस्तुत: आरोग्याशिवाय जीवनच शक्य नाही.

## बालमृत्यू अध्ययन क्षेत्रे




## निरीक्षणे



# ४. संशोधन कुणासाठी? कसे?
# - चार पायऱ्या

वर्ष १९८६. राणी व मी 'समाजसेवा' करायला, आरोग्यसेवा द्यायला गडचिरोलीत पोचलो होतो. एक दहा वर्षांची मुलगी रुग्णालयात दाखल झाली. काही लक्षणांमुळे तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्या मुलीला हृदयरोग असल्याचे वाटत होते. त्यांनी माझ्याकडे पाठवले. पण मुलीला सिकल सेल रोग असल्याचा मला संशय आला. तोपर्यंत या जिल्ह्यात सिकल सेल रोगाची एकही नोंद नव्हती. तपासणीअंती मुलीला सिकल सेल असल्याचे निदान झाले. आता माझ्यातला नुकताच अमेरिकेत शिकून आलेला संशोधक जागा झाला. 'मी हे नवंच शोधून काढलं. यातून मोठं संशोधन आता मी करू शकेन!' माझे मन उत्साहाने म्हणाले.

आम्ही स्थापन केलेल्या सर्च (SEARCH – Society for Education, Action and Research in Community Health) संस्थेद्वारे तज्ज्ञांच्या सहकार्याने आम्ही सिकल सेलचे जिल्हा पातळीवर नमुना सर्वेक्षण केले. लोकांना सिकल सेल रोग माहीतच नव्हता. पण तरी रक्त तपासणीसाठी लोक तयार झाले. जिल्ह्यात जवळपास सहा हजार लोकांना सिकल सेल असल्याचे आणि जवळपास एक लाख लोकांमध्ये सिकल सेलचा जनुक असल्याचे अनुमान या सर्वेक्षणावरून निघाले. या आकड्यांवरून आम्ही शोधनिबंध प्रकाशित केला. महाराष्ट्र शासनाने मला 'आदिवासी-सेवक' पुरस्कार दिला. पण गडचिरोलीत सिकल सेल रोगासाठी काही व्हावे, अशी आमची धडपड होती. आम्ही हा शोध आरोग्यमंत्र्यांना सादर केला. त्यांनी आमच्या कामाचे कौतुक केले आणि महाराष्ट्र शासन गडचिरोलीत 'आदिवासी वैद्यकीय संशोधन केंद्र' उभारणार असल्याची घोषणाही केली. पण या केंद्राची स्थापन पुण्यात

# २. थेंबातला समुद्र, कणातली पृथ्वी

*('समाज परिवर्तनातला जनसहभाग आटला आहे का? चळवळी थंडावल्या का? मार्ग काय?' या प्रश्नावर प्रकट केलेले मुक्तचिंतन.)*

**चळवळींचे बदलते रूप :**

*To see a world in a grain of sand,*
*And a heaven in a wild flower,*
*Hold infinity in the plam of your hand,*
*And eternity in an hour.*

*William Blake*

*मातीच्या एका कणात अख्खी पृथ्वी बघता आली पाहिजे.*

*पाण्याच्या एका थेंबात समुद्र शोधता आला पाहिजे.*

*शेवटी पृथ्वी आणि समुद्र म्हणजे तरी काय असतात? समुद्र म्हणजे पाण्याच्या एका थेंबाचा अब्जावधी पटीने गुणाकार असतो. .. आणि पृथ्वी तरी मातीपेक्षा कुठे वेगळी असते? हे यातले अध्यात्म.. जे ब्रह्मांडात आहे, तेच पिंडात आहे. तुम्ही पिंडच हाताळू शकता, ब्रह्मांड नाही. मातीचा एक कणच आपण उचलू शकतो. अवघी पृथ्वी उचलणे आपल्या आवाक्याबाहेरचे आहे. मातीच्या कणापासूनच कामाला सुरुवात करायला हवी.*

*हेच विज्ञान आणि हेच अध्यात्मही!*

चळवळ बांधण्याचे गुपित यात लपलेले आहे.